मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# ॲम्युनिटी 'टीडीआर' घोटाळ्यात पिंपरी-चिंचवडमधील तीन आमदार?

## महाविकास आघाडीच्या आरोपाने राजकीय वातावरण तापले

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्स्प्रेस मराठी।** अंदाजपत्रक फुगवून जादा सुविधांचा हस्तांतरित विकास हक्क (ॲम्युनिटी टीडीआर) देत ६७१ कोटी रुपयांचा फायदा विकसकाला दिल्याचे प्रकरण विरोधी पक्षनेत्याने उघडकीस आणले. मात्र, शहरातील तिन्ही आमदारांनी हा प्रश्न उपस्थित केला नसल्याने त्यांचाही यामध्ये सहभाग आहे की काय? असा सवाल महाविकास आघाडीने केला. या कथित घोटाळ्याची चौकशी करून दोषींवर कारवाईची मागणीही त्यांनी केली. ठाकरे गटाचे पुणे जिल्हाप्रमुख गौतम चाबुकस्वार, शहरप्रमुख सचिन भोसले, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष तुषार कामठे, काँग्रेसचे शहराध्यक्ष कैलास कदम, अनंत कोऱ्हाळे, संतोष सौंदणकर यांनी हा आरोप केला आहे. चाबुकस्वार म्हणाले, विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी महापालिकेतील हस्तांतरित विकास हक्क घोटाळा उघडकीस आणला. मात्र, शहरातील तिन्ही आमदारांनी हा प्रश्न उपस्थित केला नसल्याने त्यांचाही यामध्ये सहभाग आहे की काय, अशी शंका निर्माण झाली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे नगरविकास खाते असून, सरकारच्या वरदहस्तानेच महापालिकेत भ्रष्टाचार सुरू आहे. आयुक्तांवर कोणाचाच वचक नाही, त्यामुळे ते सुसाट सुटले असून, सरकारने या घोटाळ्याची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी. महापालिकेची आर्थिक स्थिती चांगली असून, हे आरक्षण बांधकाम व्यावसायिकाला न देता स्वतः विकसित करावे. हस्तांतरित विकास हक्क घोटाळ्यात महापालिका आयुक्त, नगररचना, बांधकाम परवाना विभागातील अधिकाऱ्यांचा हात आहे. अधिकाऱ्यांना दहा आणि तीन आमदारांना दहा टक्के रक्कमेचे वाटप झाले आहे. महापालिकेत प्रचंड आर्थिक लुट सुरू असून, आमदार, पालकमंत्र्यांचे नियंत्रण नाही, असा आरोप कामठे यांनी केला.




# कै. मनीषा भोईर ट्रस्टच्या वतीने बचतगटांचा सत्कार

## कै. मनीषा भोईर ट्रस्टच्या वतीने महिलांसाठी आरोग्य शिबिराचे आयोजन

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्स्प्रेस मराठी।** कै.मनीषा भोईर यांच्या १४ व्या पुण्यस्मरण दिनानिमित्त कै.मनीषा भाऊसाहेब भोईर ट्रस्टच्या वतीने पाच वर्षे व दहा वर्षे पूर्ण झालेल्या प्रेमलोक पार्क, इंदिरा नगर, बिजलीनगर, भोईर नगर आणि दळवीनगर मधील महिला बचतगटांचा सत्कार समारंभ शुक्रवारी (दि.१५) रोजी मनीषा स्मृती निवास, भोईर नगर चिंचवड येथे संपन्न झाला. यावेळी महिलांसाठी आरोग्य शिबिराचे देखील आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सौ. किरण हर्षवर्धन भोईर यांनी केले. यावेळी स्थानिक उल्लेखनीय कार्य महिला बचतगट पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पिंपरी चिंचवड महिला राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्ष कविता आल्हाट यांच्या हस्ते परिसरातील नविन महिला बचत गटांचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी कविता आल्हाट यांनी महिला बचत गटांनी व्यवसायात कसे उतरावे व त्याचा प्रसार कसा करावा व त्याचा प्रसार कसा करावा याविषयी मार्गदर्शन केले. तसेच भविष्यात त्याची उपलब्धता कशी आहे हे सांगितले. कै. मनिषा भाऊसाहेब भोईर यांच्या आठवणींना उजाळा देताना माजी नगरसेविका वैशालीताई काळभोर म्हणाल्या, प्रभागातील महिलांच्या मदतीसाठी मनिषा भोईर नेहमी तत्पर असत, त्याप्रमाणे किरण भोईर या कार्यतत्पर असतात. त्यांच्याच पाऊलावर पाउल ठेऊन आज सौ. किरण भोईर खंबीरपणे या सर्व बचत गटांच्या मागे उभ्या आहेत. त्या वेळोवेळी महिलांसाठी आरोग्य शिबीर व इतर उपक्रम राबवीत असतात ज्यामधून महिलांना व्यवसायिक व आर्थिक समृद्धी मिळते. तसेच समाजात वावरतांना त्यांना योग्य दिशा मिळते. किरण भोईर यांनी बचत गट आणि त्यांच्या कार्यक्षमतेवर प्रकाश टाकला. एक महिला स्वयंस्फूर्तीने महिला बचत गटामार्फत कितपत काम करू शकते याबाबत तसेच महिला बचत गटने सतत कृतीशील रहावे असे प्रतिपादन केले. यावेळी महासंघाच्या वतीने प्रभागातील १० वर्षे पूर्ण केलेल्या कृतीशील महिला बचत गटांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.



# पोलिसांसमोरच नियमांचे उल्लंघन!

## पादचाऱ्यांना रस्ता ओलांडताना मोठी कसरत करावी लागत आहे

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।** पिंपळे गुरवमधील काटेपूरम चौकात वाहतूक कोंडी नित्याची बाब झाली आहे. चौकात चारही दिशांनी बेशिस्तपणे वाहने चालविली जातात. त्यामुळे, पादचाऱ्यांना रस्ता ओलांडताना मोठी कसरत करावी लागत आहे.



वाहतूक पोलिसांसमोरच वाहतुकीचे नियम धाब्यावर बसविले जात आहेत. चौकातील वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी सिग्नल यंत्रणा बसवून वाहतूक बेट करावे, अशी मागणी स्थानिक नागरिकांसह वाहनचालकांकडून होत आहे.काटेपूरम चौक परिसर हा अत्यंत वर्दळीचा परिसर आहे. या चौकातून पिंपळे गुरवकडून पुण्या कडे जाणारा मुख्य मार्ग तसेच मयुरीनगरी ते रामकृष्ण चौकाकडे जाणारा मुख्य मार्ग असल्यामुळे या मार्गाहून वर्दळ असते. तसेच या भागात शाळा, कॉलेजेसची संख्या देखील अधिक आहे. परिणामी, शालेय महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची येथे कायमच मोठी वर्दळ असते. मात्र,येथे चोहोबाजूंनी एकाच वेळी येणाऱ्या वाहनांमुळे रस्ता ओलांडताना विद्यार्थी, लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना मोठी कसरत करावी लागत आहे.

शिवाय या रस्त्याच्या लगतच अनधिकृत पथारी, भाजी विक्रेते बसत असल्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत असतो. सिग्नल नसल्याने वाहनचालक चुकीच्या मार्गाने वाहने चालवितात. वाहतूकीचे नियम धाब्यावर बसवून मार्गक्रमण होत असल्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे.रिक्षा, खासगी बसेस, फेरीवाले, खासगी वाहनचालक यांच्याकडून बेशिस्त पार्किंग केली जाते. वाहतूक पोलिसांसमोर वाहतुकीचे नियम पायदळी तुडवले जातात. पिंपळे गुरवमध्ये प्रशस्त रस्ते झाले. मात्र, अतिक्रमणे, हातगाडी, पथारीवाले आणि पार्किंगच्या समस्येने या रस्त्यांना व्यापून टाकले. त्यात, वाहतूक पोलिसांच्या ढिसाळ नियोजनामुळे ही अवस्था दिवसेंदिवस बिकट होत आहे. या वाहतूक कोंडीतून शहरवासीयांना मुक्त करण्याचे सौजन्य प्रशासन दाखवेल का ? हा मोठा यक्ष प्रश्न पिंपळे गुरववासीयांसमोर आहे.

> “ सांगवी फाटा येथे मुख्य रस्त्याचे काम चालू आहे. त्या रस्त्याची रहदारी या चौका मार्गे होत आहे. बंदोबस्त कामी अनेक कर्मचारी बाहेर आहेत. या चौकात वाहतूक नियमन करण्यासाठी त्वरित उपाययोजना केली जाईल.
>
> – प्रसाद गोकुळे, वाहतूक पोलिस निरीक्षक

> “ पिंपरी-चिंचवड व पुणे शहरला जोडणारा हा मुख्य रस्ता आहे. त्यामुळे, काटेपूरम चौक, कृष्णा चौक व साई चौकात वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी वाहतूक शाखेने सायंकाळी ६ ते ९ वाजेपर्यंत पोलिस कर्मचारी नेमावेत. बेशिस्त पार्किंग केलेल्या वाहनांवर कारवाई करावी.
>
> – संजय मराठे, सामाजिक कार्यकर्ते

# तळवडे आग दुर्घटनेतील आणखी एका महिलेचा मृत्यू

## तळवडे आग दुर्घटनेतील एकुण मृतांची संख्या १२ वर



**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।** पिंपरी चिंचवड परिसरातील तळवडे येथील कारखान्यात झालेल्या आग दुर्घटनेतील जखमी रुग्ण सुमन गोधडे (वय ४० वर्षे) यांचे रात्री दोन वाजता ससून रुग्णालयामध्ये उपचारादरम्यान आज निधन झाले. ही अत्यंत दु:खद घटना असुन कुटुंबियांच्या दु:खात आम्ही सहभागी आहोत, अशा शब्दांत आयुक्त शेखर सिंह यांनी दु:ख व्यक्त केले आहे. तळवडे येथील एका कारखान्यामध्ये दि. ८ डिसेंबर रोजी घडलेल्या आग दुर्घटनेत ६ जणांचा घटनास्थळी मृत्यू झाला होता तर १० जण जखमी झाले होते. जखमींना पुढील उपचारांसाठी तातडीने पुणे येथील ससून रुग्णालयात पाठविण्यात आले होते. त्यातील प्रतिक्षा तोरणे (वय १६ वर्षे) आणि कविता राठोड (वय ४५ वर्षे) यांचे दि.९ डिसेंबर रोजी तर शिल्पा राठोड (वय ३१ वर्षे) यांचे दि. १० डिसेंबर रोजी ससून रुग्णालयात उपचारादरम्यान निधन झाले. तर प्रियंका यादव (वय ३२ वर्षे) आणि अपेक्षा तोरणे (वय १८ वर्षे) यांचे दि.१४ डिसेंबर रोजी उपचारादरम्यान निधन झाले. आज आणखी एक जखमी महिलेचे निधन झाल्याने तळवडे आग दुर्घटनेतील आतापर्यंतच्या मृतांची संख्या १२ इतकी झाली आहे. या घटनेतील जखमी रुग्ण उषा पाडवी, कोमल चौरे, रेणुका ताथोड आणि शरद सुतार यांच्यावर ससून रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

# सरकारचं तुमच्या आरोग्यावर लक्ष!

## आतापर्यंत दीड कोटीपेक्षा जास्त पुरुषांची तपासणी

**पुणे।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

निरोगी आरोग्य तरुणाईचे, वैभव महाराष्ट्राचे' अभियानांतर्गत आतापर्यंत १ कोटी ५९ लाख पेक्षा अधिक पुरुषांची मोफत आरोग्य तपासणी यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आली आहे. तानाजी सावंत यांच्या संकल्पनेतून १८ वर्षांवरील पुरुषांच्या सर्वांगीण आरोग्य तपासणीसाठी १७ सप्टेंबरला हे अभियान सुरु करण्यात आले. या अभियानांतर्गत राज्यातील सुमारे ४ कोटी ६७ लाख पुरुषांची मोफत आरोग्य तपासणी करण्याचे उद्दिष्ट आरोग्य विभागामार्फत ठेवण्यात आले आहे. या अभियानांतर्गत १६ डिसेंबरपर्यंत १८ वर्षांवरील १,५९,५१,४०९ पुरुषांची मोफत आरोग्य तपासणी पूर्ण करण्यात आलेली आहे. त्यापैकी १,५०,०७,७७५ लाभार्थ्यांच्या आवश्यक त्या चाचण्या शासकीय आरोग्य संस्थांमध्ये करण्यात आलेल्या असून, त्यापैकी २१,८५,७०३ लाभार्थ्यांना औषधोपचार देण्यात आलेले आहे. तर जवळपास १८,८०१ लाभार्थ्यांवर लहान-मोठ्या शस्त्रक्रिया सार्वजनिक आरोग्य विभागाअंतर्गत रुग्णालयांमध्ये करण्यात आलेल्या आहेत. ही मोहीम ३१ डिसेंबरपर्यंत राबविण्यात येणार असून, त्यानंतर गरजेनुसार मोहिमेचा कालावधी वाढविण्याचा निर्णय घेतला जाणार आहे. आरोग्यवर्धिनी केंद्र, उपकेंद्र, आरोग्यवर्धिनी केंद्र प्राथमिक आरोग्य केंद्र, शहरी भागातील प्राथमिक आरोग्य केंद्र, शहरी भागातील सामुदायिक आरोग्य केंद्र, शहरी आरोग्यवर्धिनी केंद्र व हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, सामान्य रुग्णालय, जिल्हा रुग्णालय, संदर्भ सेवा रुग्णालय या स्तरावर रुग्णांना आवश्यक सेवा उपलब्ध करून दिल्या आहेत. या सर्व आरोग्य संस्थांमध्ये १८ वर्षांवरील पुरुषांची मोफत आरोग्य तपासणी, आवश्यक चाचण्या, गरजेनुसार ईसीजी, सिटीस्कॅन, एक्स-रे इत्यादी सुविधा मोफत दिल्या जाणार आहेत आणि गरजेनुसार रुग्णांना आवश्यक शस्त्रक्रिया सार्वजनिक आरोग्य विभागाअंतर्गत रुग्णालयांमध्ये



मोफत केल्या जाणार आहेत. त्याचप्रमाणे, गरजेनुसार रुग्णांना मोठ्या शस्त्रक्रियांसाठी वैद्यकीय महाविद्यालय व शासनमान्य महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत तसेच पंतप्रधान जन आरोग्य योजनांतर्गत नोंदणीकृत केलेल्या रुग्णालयांमध्ये संदर्भित केले जाणार आहे. माननीय मुख्यमंत्री व माननीय आरोग्यमंत्री यांच्या प्रेरणेतून सुरू असलेल्या 'निरोगी आरोग्य तरुणाईचे, वैभव महाराष्ट्राचे' या अभियानासाठी विशेष ॲपची निर्मिती करण्यात आलेली आहे. या ॲपच्या माध्यमातून सर्व आरोग्य केंद्रांच्या ठिकाणी आरोग्य कर्मचारी तसेच वैद्यकीय अधिकारी यांच्यामार्फत रुग्णांची नोंदणी, त्यांना दिलेले औषध उपचार तसेच करण्यात आलेल्या शस्त्रक्रिया, करण्यात आलेल्या चाचण्या, या माहितीची नोंद त्या ठिकाणी केली जाते. या अभियानांतर्गत १६ डिसेंबरपर्यंत १८ वर्षांवरील १,५९,५१,४०९ पुरुषांची मोफत आरोग्य तपासणी पूर्ण करण्यात आलेली आहे. त्यापैकी १,५०,०७,७७५ लाभार्थ्यांच्या आवश्यक त्या चाचण्या शासकीय आरोग्य संस्थांमध्ये करण्यात आलेल्या असून, त्यापैकी २१,८५,७०३ लाभार्थ्यांना औषधोपचार देण्यात आलेले आहेत. तर जवळपास १८,८०१ लाभार्थ्यांवर लहान-मोठ्या

### पुरुषांची मोफत तपासणी

**» ही मोहीम ३१ डिसेंबरपर्यंत राबविण्यात येणार असून, त्यानंतर गरजेनुसार मोहिमेचा कालावधी वाढविण्याचा निर्णय घेतला जाणार आहे. आरोग्यवर्धिनी केंद्र, उपकेंद्र, आरोग्यवर्धिनी केंद्र प्राथमिक आरोग्य केंद्र, शहरी भागातील प्राथमिक आरोग्य केंद्र, शहरी भागातील सामुदायिक आरोग्य केंद्र, शहरी आरोग्यवर्धिनी केंद्र व हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, सामान्य रुग्णालय, जिल्हा रुग्णालय, संदर्भ सेवा रुग्णालय या स्तरावर रुग्णांना आवश्यक सेवा उपलब्ध करून दिल्या आहेत. या सर्व आरोग्य संस्थांमध्ये १८ वर्षांवरील पुरुषांची मोफत आरोग्य तपासणी, आवश्यक चाचण्या, गरजेनुसार ईसीजी, सिटीस्कॅन, एक्स-रे इत्यादी सुविधा मोफत दिल्या जाणार आहेत आणि गरजेनुसार रुग्णांना आवश्यक शस्त्रक्रिया सार्वजनिक आरोग्य विभागाअंतर्गत रुग्णालयांमध्ये मोफत केल्या जाणार आहेत.**

शस्त्रक्रिया सार्वजनिक आरोग्य विभागाअंतर्गत रुग्णालयांमध्ये करण्यात आलेल्या आहेत. ही मोहीम ३१ डिसेंबरपर्यंत राबविण्यात येणार असून, त्यानंतर गरजेनुसार मोहिमेचा कालावधी वाढविण्याचा निर्णय घेतला जाणार आहे. आरोग्यवर्धिनी केंद्र, उपकेंद्र, आरोग्यवर्धिनी केंद्र प्राथमिक आरोग्य केंद्र, शहरी भागातील प्राथमिक आरोग्य केंद्र, शहरी भागातील सामुदायिक आरोग्य केंद्र, शहरी आरोग्यवर्धिनी केंद्र व हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, सामान्य रुग्णालय, जिल्हा रुग्णालय, संदर्भ सेवा रुग्णालय या स्तरावर रुग्णांना आवश्यक सेवा उपलब्ध करून दिल्या आहेत.

# पुणे मेट्रो विस्तारित मार्गात अडचणींची मालिका!

## येरवडा आणि रामवाडी स्थानके हलविण्यासाठी नोटीस

**पुणे।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

पुणे मेट्रोची रुबी हॉल ते रामवाडी या मार्गावरील सेवा या वर्षाच्या अखेरीस सुरू होणे अपेक्षित होते. परंतु, येरवडा स्थानकाचे जिने रस्त्यावर येत असल्याने महापालिकेने बदल सुचविला. त्यामुळे या स्थानकाच्या प्रवेशद्वाराचे जिने महामेट्रोला दुसरीकडे हलवावे लागले. त्यातच आता नगर रस्त्यावरील काही नागरिकांनी येरवडा आणि रामवाडी स्थानके दुसरीकडे हलविण्यासाठी महामेट्रोला कायदेशीर नोटीस बजावली आहे.

या मार्गावरील सेवा सुरू होण्यास विलंब लागण्याची चिन्हे आहेत. रुबी हॉल ते रामवाडी या मार्गावरील येरवडा स्थानकाचे जिने नगर रस्त्यावर येत होते. महामेट्रोकडून या जिन्यांसाठी खांब उभारणीचे काम सुरू करण्यात आले होते. परंतु, स्थानिक नागरिकांनी वाहतूककोंडी होत असल्याने या कामाला विरोध केला. अखेर महापालिकेने हे जिने दुसरीकडे हलविण्यास महामेट्रोला सांगितले. त्यानुसार महामेट्रोने रचनेत काही बदल केले. या बदलामुळे येरवडा



स्थानकाच्या जिन्याचे काही खांब पाडण्याची वेळ महामेट्रोवर आली. आता ते नव्याने उभारले जाणार आहेत. येरवडा स्थानकाचा तिढा सुटताच नगर रस्त्यावरील नागरिकांनी महामेट्रोची कायदेशीर कोंडी केली आहे.

नगर रस्ता नागरिक मंचाचे विंग कमांडर (निवृत्त) आशुतोष माशूवाला, नागरी हक्क कार्यकर्त्या कनीज सुखरानी आणि उमेश मगर यांनी ही नोटीस बजावली आहे. त्यांनी नोटिशीत म्हटले आहे की, येरवडा आणि रामवाडी ही मेट्रो स्थानके रस्त्याच्या विकास आराखड्यात येत आहेत. ही स्थानके रस्त्यात बांधण्यात आल्याने वाहतूककोंडी होत आहे. या स्थानकांमुळे नगर रस्त्याच्या विकास आराखड्यावर अतिक्रमण झाले आहे. त्यामुळे ही स्थानके खासगी अथवा सरकारी जागेत हलवावीत. रुबी हॉल ते रामवाडी या मार्गावरील येरवडा स्थानकाचे जिने नगर रस्त्यावर येत होते. महामेट्रोकडून या जिन्यांसाठी खांब उभारणीचे काम सुरू करण्यात आले होते. परंतु, स्थानिक नागरिकांनी वाहतूककोंडी होत असल्याने या कामाला विरोध केला. अखेर महापालिकेने हे जिने दुसरीकडे हलविण्यास महामेट्रोला सांगितले. त्यानुसार महामेट्रोने रचनेत काही बदल केले. या बदलामुळे येरवडा स्थानकाच्या जिन्याचे काही खांब पाडण्याची वेळ महामेट्रोवर आली. आता ते नव्याने उभारले जाणार आहेत. पुणे मेट्रोची रुबी हॉल ते रामवाडी या मार्गावरील सेवा या वर्षाच्या अखेरीस सुरू होणे अपेक्षित होते.

# वायु प्रदुषण टाळण्यासाठी कॅन बायोसिसकडून उत्तम पर्याय!

## कॅन बायोसिस कंपनीला फिक्कीकडून पहिल्या क्रमांकाचा पुरस्कार

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।**

कॅन बायोसिस या कंपनीला फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज (फिक्की) च्यावतीने प्रथम क्रमांकाच्या राष्ट्रीय सस्टेनेबल ॲग्रीकल्चर पुरस्काराने गौरविण्यात आले. भाताची पराली जाळण्याऐवजी आहे त्या शेतातच मातीत पूर्णतः एकजीव करणारे तंत्रज्ञान कॅन बायोसिसने शोधले आहे. त्यासाठी कॅन बायोसिस कंपनीला हा पुरस्कार देण्यात आला आहे. फिक्की हाऊस, नवी दिल्ली येथे आयोजित तिसर्‍या शाश्वत कृषी शिखर परिषदेत पुरस्कार प्रदान करण्यात आला. फिक्की ही व्यवसाय आणि उद्योग क्षेत्रातील भारतातील सर्वात मोठी आणि जुनी संस्था आहे.




शाश्वत शेतीला चालना देणारे संशोधन केल्याबद्दल कॅन बायोसिसची देश पातळीवर निवड करण्यात आली. कॅन बायोसिसच्या संस्थापिका व व्यवस्थापकीय संचालिका संदीपा कानिटकर यांनी पुरस्कार स्वीकारला. तसेच कॅन बायोसिसच्या तंत्रज्ञान प्रमुख डॉ. मेधा कुलकर्णी, विपणन आणि मानव संसाधन विभागाचे सह-उपाध्यक्ष डॉ. प्रशांत पवार, विक्री सह-उपाध्यक्ष राहुल पारखी उपस्थित होते.

देशाची राजधानी नवी दिल्ली येथे दरवर्षी हिवाळ्यात वायू प्रदूषणाचा प्रश्न गंभीर होतो. यामागे हरियाणा-पंजाबातील पराली (तांदळाचे काड) जाळली जाणे हे मुख्य कारण असते. ही पराली जाळण्याऐवजी आहे त्या शेतातच मातीत पूर्णतः एकजीव करणारे तंत्रज्ञान कॅन बायोसिसने शोधले. लुधियाना येथील पंजाब कृषी विश्वविद्यालय आणि हिस्सार येथील हरियाणा कृषी विश्वविद्यालय यांनी दोन वर्षे चाचण्या घेऊन हे संशोधन प्रमाणित केले. त्यानंतर हरियाणा-पंजाबातील दहा जिल्ह्यांमधले हजारो शेतकरी या संशोधनाचा यशस्वी वापर करत आहेत. हार्वेस्टरने भाताची सुगी झाल्यानंतर भाताचे काड शेतात शिल्लक राहते. ते काढून टाकणे खूप खर्चिक असल्याने ते पेटवून देणे एवढाच उपाय शेतकर्‍यांकडे असतो. मात्र त्यामुळे जमिनीतील कार्बन जळून जातो आणि जैविक सृष्टीचा नाश होतो. परिणामी मातीची सुपिकता नष्ट होते. मातीची पाणी धरून ठेवण्याची क्षमता कमी होते. जमीन कडक झाल्याने रासायनिक खतांची उपयुक्तता खालावते. साहजिकच पिकांचा उत्पादन खर्च वाढूनही उत्पादकता वाढत नाही. शिवाय पराली जाळल्यामुळे प्रचंड वायू प्रदूषण होते. हे दुष्टचक्र थांबविण्यासाठी कॅन बायोसिसने अथक आठ वर्षे संशोधन करून शाश्वत उपाय शोधला. एकरी चार किलो स्पीड कंपोस्ट हे उत्पादन युरियासोबत वापरल्यास भाताचे एकरी सुमारे अडीच टन काड मातीत पूर्णतः एकजीव होते. 'स्पीड कंपोस्ट'मधील बावीसहून अधिक प्रकारचे जिवाणू भात काडाचे विघटन करतात. त्यामुळे अवघ्या पंधरा दिवसानंतर हरियाणा-पंजाबातील शेतकर्‍यांना भातानंतरचे दुसरे गव्हाचे पीक घेण्यासाठी शेत उपलब्ध होते. पराली जाळल्याने रासायनिक खतांचा वापर करून पिकवलेल्या भातातील नत्र, स्फुरद, पालाश (एनपीके) प्रचंड प्रमाणात वाया जाते. पंजाब, हरियाणात भात पिकासाठी वापरल्या जाणार्‍या एकूण रासायनिक खतांपैकी ६५ टक्के 'एनपीके'चा र्‍हास पराली जाळल्याने होत असल्याचे आढळून आले. असेच नुकसान गहू, ऊस, कापूस आदी पिकांचे अवशेष जाळल्याने होत असते. 'स्पीड कंपोस्ट'मधील २२ पेक्षा अधिक जिवाणूंच्या प्रभावी वापरामुळे हे नुकसान टाळण्यात पंजाब-हरियाणातील हजारो शेतकर्‍यांनी यश मिळवले आहे.

# दुधाचे दर घसरल्याने दुग्ध व्यवसायाला घरघर!

## दूध उत्पादक शेतकरी अडचणीत

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।**

गेल्या तीन आठवड्यांपासून दुधाचे दर कमी झाल्याने शेतकर्‍यांच्या समोरील अडचणी वाढल्या आहेत. शेतीला पूरक म्हणून अनेक तरुण या व्यवसायाकडे वळले खरे मात्र घसरलेल्या दरामुळे दूध धंदा आतबट्ट्याचा खेळ बनला आहे. ३५ रुपये लिटरने विक्री होणारे दूध सध्या २३ ते २७ रुपयांपर्यंत खाली आल्याने ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकट करणार्‍या दुग्ध व्यवसायाला घरघर लागली आहे. बारामती तालुक्याच्या पश्चिम भागात मोठ्या प्रमाणात दुग्ध व्यवसाय केला जातो. अनेक तरुण या व्यवसायाकडे वळले आहेत. मात्र, चालू वर्षी कमी झालेला पावसाळा, चार्‍याची कमतरता, पशुखाद्यांचे वाढलेले दर, दुधाचे घसरलेले दर यामुळे हा व्यवसाय अडचणीत आला आहे. गेल्या महिन्यात



तरडोली व कोर्‍हाळे येथील दूध व्यवसायिकांनी दुधाचे दर वाढावे यासाठी आंदोलन केले. मात्र, सरकारकडून याला प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे राज्य सरकारकडून शेतकर्‍यांची अवहेलना सुरू असल्याचे चित्र आहे. दुधाचे दर वाढवण्यासाठी मागणी करूनही सरकारचे याकडे दुर्लक्ष होत आहे. सध्या हॉटेलमध्ये विकत मिळणार्‍या बाटलीबंद पाण्यापेक्षा शेतकर्‍यांकडून खरेदी केले जाणारे दूध स्वस्त आहे. हॉटेलमध्ये बाटलीतील पाण्याचा दर प्रतीलिटर किमान ३० रुपये, तर शेतकर्‍यांकडून खरेदी केल्या जाणार्‍या प्रतीलिटर दुधाचा दर २५ रुपयांहून कमी आहे. बेरोजगारीवर मात करीत अनेक तरुणांनी हा व्यवसाय उभा केला. प्रसंगी कर्ज काढले, प्रक्रिया उद्योग उभारले. मात्र, दुधाला दर नसल्याने तरुण हतबल झाल्याचे चित्र आहे. राज्य सरकारने फक्त दुधाचे भाव जाहीर करण्याचे नाटक केले, प्रत्यक्षात मात्र निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी सरकार कोणतीही मदत करायला तयार नाही, असा आरोप दूध उत्पादक शेतकरी करत आहेत. दुष्काळाचे सर्वाधिक चटके दूध व्यवसायाला बसत आहेत. दुभत्या गाई-म्हशींसाठी चारा उपलब्ध नाही.